दि. 21/03/2026

**प्रेसनोट**

## नांदेड परिक्षेत्रात गुटखा विरोधी मोहीम

## आणखी पाच कारवायांत नऊ जण गजाआड, (8) लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक 16 ते 31 मार्च, 2026 दरम्यान, पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविरुद्ध व्यापक मोहीम उघडली आहे.

कॅन्सर सारख्या दुर्धर रोगांपासून, नागरिकांचा बचाव व्हावा, या दृष्टिकोनातून ही मोहीम राबविण्यात येत आहे. सदर मोहिमेच्या पाचव्या दिवशी, गुटखा विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध आणखी (5) गुन्हे नोंदवत, अशा व्यवसायांत गुंतलेल्या एकूण (9) आरोपींना पोलिसांनी गजाआड केले आहे.

सदर मोहिमेअंतर्गत, नांदेड जिल्ह्यातील भाग्यनगर व मुखेड, परभणी जिल्ह्यातील बोरी, लातूर जिल्ह्यातील उदगीर ग्रामीण व हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ अशा पाच पोलीस ठाण्यांनी या कारवाया केल्या असून, यात कलम 123, भारतीय न्याय संहिते अंतर्गत (9) आरोपींविरुद्ध एकूण (05) गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांत निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून एकूण 8,42,090/- रुपये किंमतीचा गुटखा व अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहे.

सदर मोहिमेदरम्यान, स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, अपमित्रके युक्त चघळण्याची तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी, गुटखा, पान मसाला, खर्रा, मावा व तत्सम पदार्थांची साठवण, वितरण व वाहतूक याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम 123 अन्वये कारवाई करण्यात येत आहे.

उपरोक्त पदार्थांच्या संदर्भात, संबंधिताविरुद्ध कलम 123 बी.एन.एस. अन्वये करण्यात आलेल्या कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असून त्यास दहा पर्यंतच्या कारावासासह द्रव्य दंडाची देखील शिक्षा असल्याने, पोलिसांच्या सदर कारवाईचे दृश्य परिणाम दिसून येत आहेत.

**' खबर ' हेल्पलाइन चा वापर करा :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना पोहोचाविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड